अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | गुरुवार
०२.०७.२०२६

वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १५२ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

# शेतकऱ्यांना रॉयल्टीतून 'मुक्ती'!

## शेतघर, विहीर, गोठ्यासाठी माती-मुरूम वापरल्यास दंडात्मक कारवाई नाही

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेती सुधारण्यासाठी, तसेच स्वतःचे शेतघर, विहीर आणि जनावरांचा गोठा यांसारख्या विविध बांधकामांसाठी आवश्यक असणाऱ्या गौण खनिजांच्या (गाळ, माती, मुरूम) वापरावरील स्वामित्व धन म्हणजेच रॉयल्टी पूर्णपणे माफ करण्याचा मोठा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान आज विधान परिषदेत महायुती सरकारकडून शेतकऱ्यांच्या हिताचा एक अत्यंत ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर करण्यात आला आहे. राज्याचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान परिषदेत यासंदर्भातील अधिकृत निवेदन सादर केले. सरकारच्या या अत्यंत संवेदनशील निर्णयामुळे आता शेतकऱ्यांना आपल्या हक्काची माती आणि मुरूम वापरताना कोणत्याही शासकीय दंडाचा किंवा कायदेशीर कारवाईचा सामना करावा लागणार नाही. जलस्रोत आणि स्वतःच्या शेतातून माती काढण्याची मुभा या संदर्भात सभागृहात सविस्तर माहिती देताना मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आणि सामाजिक विकास हा प्रामुख्याने शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. ग्रामीण भागातील बहुतांश लोकसंख्या आजही उपजीविकेसाठी शेतीवरच निर्भर असल्याने त्यांना दिलासा देणे आवश्यक होते. या निर्णयानुसार आता मृद व जलसंधारण विभाग तसेच जलसंपदा विभागाच्या अखत्यारीत असणारे जलस्रोत, जसे की गावतळी, शेततळी, पाझर तलाव, शेतविहीर, तसेच महसुली व इतर नाले यांमधून गाळ आणि माती काढण्यासाठी शेतकऱ्यांना विशेष सवलत देण्यात आली आहे.

याशिवाय, शेतकरी स्वतःच्या शेतातूनही माती किंवा मुरूम काढू शकणार आहेत. पावसाळ्यात शेतात पडणारे खड्डे बुजवणे, रस्त्यांची दुरुस्ती करणे आणि चिखल दूर करणे यासाठी या गौण खनिजाचा वापर करता येईल.

# मुंबईत मॅनहोलमध्ये पडून मृत्यू, उघड्या मॅनहोलपासून २० फूट अंतरावर मृतदेह मिळाला, बीएमसीचा कारभार चव्हाट्यावर!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – राज्यभरात पावसाने हाहाकार घातला असून मुंबईतही पावसामुळे दुर्घटना घडत आहेत. दोनच दिवसांपूर्वी चेंबूरमध्ये एका शाळेच्या बसवर झाड कोसळून शाळकरी मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली होती.

तर, मुंबईतील पावसाच्या पहिल्याच दिवशी, गेल्या आठवड्यात महापालिकेचा एक अधिकारीच मॅनहोलमध्ये पडल्याची घटना घडली होती. त्यानंतर, आता पुन्हा एकदा साकीनाका खैरनी रोड येथील मॅनहोलमध्ये एक व्यक्ती पडला. त्याला वाचविण्याचे प्रयत्न प्रशासनाकडून सुरू होते. मात्र, संबंधित व्यक्तीचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. अस्लम शेख असं या घटनेत मृत्यू झालेल्या व्यक्तीचं नाव आहे.

मुंबईतील साकीनाका येथील मॅनहोलमध्ये पडलेल्या व्यक्तीचा अखेर मृतदेहच हाती लागला आहे. साधारण ४५ वर्षांचा व्यक्ती सकाळी ११ च्या सुमारास मॅनहोलमध्ये पडली होती. जवळपास दोन तासाच्या रेस्क्यू ऑपरेशननंतर मृतदेह बाहेर काढण्यात यश आलं.

साकीनाका येथील खैराणी रोड, सन्मान हॉटेलजवळ उघड्या मॅनहोलमध्ये मोबाईलवर बोलत असताना एक व्यक्ती पडली. खासगी कंत्राटदाराकडून देखभाल काम सुरू असताना मॅनहोलचे झाकण उघडे होते. शोधादरम्यान संबंधित व्यक्तीची छत्री आणि चप्पल आढळली असून पाण्याचा वेग जास्त असल्याने ती व्यक्ती वाहून गेली होती. यावेळी महापालिकेचे कर्मचारी, पोलीस, १०८ रुग्णवाहिका आणि संबंधित विभागाकडून शोधकार्य सुरू करण्यात आले. मात्र, संबंधित व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे समोर आले. मॅनहोलमधून व्यक्तीचा मृतदेह बाहेर काढण्यात आला आहे. दरम्यान, येथील मॅनहोलमध्ये पडलेला व्यक्ती साधारण ४५ वर्षांचा असून स्थानिक प्रशासन आणि पोलिसांकडून त्यास बाहेर काढण्याचे प्रयत्न करण्यात आले.

## थोडक्यात

### ठाणे अंतर्गत मेट्रोसाठी नागरिकांना विश्वासात घेणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – ठाणे शहरासाठी प्रस्तावित असलेल्या अंतर्गत भूमिगत मेट्रो प्रकल्पाबाबत स्थानिक नागरिकांच्या मनातील सर्व शंकांचे निरसन करून आणि त्यांना पूर्णपणे विश्वासात घेऊनच प्रकल्पाची अंमलबजावणी केली जाईल, अशी ग्वाही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज विधानपरिषदेत दिली. यावर सरकारची सकारात्मक आणि विकासात्मक भूमिका मांडताना उद्योगमंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले की, या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करतानाच वाहतूक व्यवस्थापन, कोळीवाड्यांचे सीमांकन, पुनर्वसन आणि नागरिकांना होणारा संभाव्य त्रास या सर्व संवेदनशील बाबींचा अत्यंत गांभीर्याने विचार करण्यात आला आहे.

# सध्या फक्त 'सचिन' आलेत, लवकरच संपूर्ण क्रिकेट टीम येणार

## बच्चू कडूंचा दावा, ठाकरे गटाच्या पडझडीला संजय राऊतच जबाबदार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्याच्या राजकारणात सध्या सुरू असलेल्या वेगवान घडामोडी आणि नेत्यांच्या पक्षांतराच्या पार्श्वभूमीवर, शिवसेनेचे आमदार बच्चू कडू यांनी एक अत्यंत खळबळजनक दावा केला आहे.

विधान परिषदेचे आमदार सचिन अहिर यांनी नुकताच उद्धव ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. या महत्त्वपूर्ण राजकीय घडामोडीवर आपली रोखठोक प्रतिक्रिया देताना बच्चू कडू यांनी ठाकरे गटावर आणि विशेषतः खासदार संजय राऊत यांच्यावर अत्यंत शेलक्या शब्दांत आणि थेट हल्लाबोल केला आहे. शिवसेना आणि ठाकरे कुटुंबावर आज जी बिकट राजकीय परिस्थिती ओढवली आहे, त्याला केवळ आणि केवळ संजय राऊत हेच जबाबदार असल्याचा घणाघात बच्चू कडू यांनी केला आहे. सचिन अहिर यांच्या पक्षांतरावर आपल्या खास शैलीत टोलेबाजी करताना बच्चू कडू म्हणाले की, 'सध्या तर फक्त 'सचिन' आले आहेत, पण येत्या काही दिवसांत त्यांची संपूर्ण क्रिकेट टीमही इकडे (शिंदे गटात) दाखल झालेली पाहायला मिळेल.' कडू यांच्या या विधानावरून ठाकरे गटातील आणखी काही मोठे नेते, पदाधिकारी आणि आमदार लवकरच सत्ताधारी पक्षात प्रवेश करणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. सध्याचे सरकार जनतेच्या हितासाठी आणि विकासासाठी काम करत असल्यानेच विरोधकांकडून मोठ्या प्रमाणावर इनकमिंग सुरू असल्याचा सूर त्यांच्या बोलण्यातून उमटला.

# दगडखाणीत ४० फुटांवरून कोसळला ग्रॅनाइटचा महाकाय खडक : ८ मजुरांचा जागीच मृत्यू, अनेक जखमी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**बंगळुरू** – कर्नाटकची राजधानी बंगळुरू येथे गुरुवारी (दि. २) सकाळी अत्यंत भीषण दुर्घटना घडली. बंगळुरू दक्षिण तालुक्यातील माडपट्टणा परिसरातील दगड खाणीत ग्रॅनाइटचा भलामोठा खडक कोसळल्याने आठ मजुरांचा मृत्यू झाला, तर अनेक जण गंभीर जखमी झाले. मृतांमध्ये बहुतांश मजूर बिहारचे रहिवासी असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. दुर्घटनेनंतर बचाव पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत ढिगारा हटवण्याचे आणि अडकलेल्या मजुरांचा शोध घेण्याचे काम सुरू केले.

४० फूट उंचीवरून कोसळला प्रचंड खडक पीटीआयच्या वृत्तानुसार, गुरुवारी पहाटे मडपट्टणा येथील दगड खाणीत मजूर नेहमीप्रमाणे उत्खननाचे काम करत होते. त्याचवेळी सुमारे ४० फूट उंचीवरून ग्रॅनाइटचा प्रचंड खडक कोसळला. या खडकाखाली अनेक मजूर दबले गेले. घटनास्थळीच सात जणांचा मृत्यू झाला, तर गंभीर जखमी झालेल्या आणखी एका मजुराचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

वाहनेही चक्काचूर दुर्घटनेची तीव्रता इतकी मोठी होती की, खडक कोसळल्यानंतर तेथे उभी असलेली दगड वाहून नेणारी वाहने पूर्णपणे चिरडली गेली. एका ट्रॅक्टरचेही तुकडे झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

# रत्नागिरीत दोन बसेसची समोरासमोर धडक

## १५ विद्यार्थी जखमी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**रत्नागिरी** – रत्नागिरीतील मिरजोळे-उक्षी मार्गावर गुरुवारी सकाळी दोन बसेसची समोरासमोर जोरदार धडक झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

या अपघातात पटवर्धन हायस्कूल आणि महाविद्यालयातील १५ विद्यार्थी जखमी झाले आहेत. सुदैवाने, या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी एका बस चालकाच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. गुरुवारी सकाळी पावणेसात ते सातच्या सुमारास हा अपघात फणसवळे (पवार कोंड) परिसरात घडला. भावे आडोम येथून विद्यार्थ्यांना घेऊन एक बस रत्नागिरीच्या दिशेने येत होती. याच दरम्यान समोरून येणाऱ्या दुसऱ्या बसशी तिची समोरासमोर भीषण धडक झाली. धडक इतकी तीव्र होती की बसमधील विद्यार्थ्यांमध्ये घबराट पसरली आणि एकच आरडाओरड झाली. ग्रामस्थांच्या तत्परतेमुळे मोठे संकट टळले अपघाताचा मोठा आवाज ऐकून परिसरातील ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी बसमधील अडकलेल्या विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे बाहेर काढले. या मदतीमुळे जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करणे शक्य झाले. घटनेची माहिती मिळताच पालकांनी रुग्णालयात मोठी गर्दी केली होती.



# थायलंडमध्ये भारतीय युद्धनौकांचा संयुक्त सराव : सागरी सुरक्षेसाठी वाढला समन्वय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – भारतीय नौदलाच्या पूर्व ताफ्यातील आयएनएस उदयगिरी, आयएनएस शक्ती आणि आयएनएस कवरत्ती या युद्धनौकांनी थायलंडसोबतच्या संयुक्त नौदल सरावात सहभाग घेतला. थायलंडमधील सत्ताहिप बंदराच्या दौऱ्यानंतर या युद्धनौकांनी रॉयल थाई नेव्हीच्या एचटीएमएस चाओ फ्राया या युद्धनौकेसोबत पॅसेक्स (पासिंग एक्सरसाइज) हा संयुक्त सराव केला. समुद्रात मित्रदेशांच्या नौदलाच्या युद्धनौका एकमेकांना भेटल्यानंतर आयोजित केला जाणारा हा विशेष नौदल सराव असतो.

भारतीय नौदलाने सोशल मीडिया मंच 'एक्स' वर दिलेल्या माहितीनुसार, पूर्व ताफ्यातील आयएनएस उदयगिरी, आयएनएस शक्ती आणि आयएनएस कवरत्ती यांनी थायलंडच्या सत्ताहिप बंदराच्या भेटीनंतर रॉयल थाई नेव्हीच्या एचटीएमएस चाओ फ्राया या युद्धनौकेसोबत पॅसेक्स सराव केला. यापूर्वी २८ जून रोजी भारतीय नौदलाच्या या तीनही युद्धनौका त्यांच्या नियोजित ऑपरेशनल तैनातीचा भाग म्हणून थायलंडमधील सत्ताहिप येथे पोहोचल्या होत्या.

पूर्व ताफ्याचे ध्वजाधिकारी रिअर ॲडमिरल आलोक आनंद यांच्या नेतृत्वाखाली या युद्धनौकांचे रॉयल थाई नेव्हीकडून औपचारिक स्वागत करण्यात आले. अधिकृत निवेदनानुसार, हा बंदर दौरा दक्षिण-पूर्व आशियाई देशांसोबत भारताच्या सागरी सहकार्याचा महत्त्वाचा भाग असून, भारत-थायलंड मधील दीर्घकालीन सागरी संबंध अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आला आहे. या भेटीदरम्यान दोन्ही नौदलांमध्ये व्यावसायिक चर्चा, क्रॉस-डेक भेटी, कार्यात्मक संवाद, क्रीडा स्पर्धा आणि सामुदायिक उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. यामुळे नौदल-ते-नौदल सहकार्य आणि संयुक्त कार्यक्षमतेला आणखी बळ मिळणार आहे. अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, या भेटीचा मुख्य उद्देश भारत आणि थायलंडमधील परस्पर सहकार्य, मैत्री आणि द्विपक्षीय सागरी संबंध अधिक दृढ करणे हा आहे.

## महत्त्वाच्या चर्चेवेळी अधिकाऱ्यांची दांडी

# नगरविकास सचिवांना विधानसभा अध्यक्षांची नोटीस

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** –मुंबईशी संबंधित अत्यंत महत्त्वाच्या आणि संवेदनशील विषयांवर विधानसभेत चर्चा सुरू असताना, अधिकारी गॅलरीमध्ये संबंधित विभागांचे सचिव आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित नसल्याने बुधवारी सत्ताधारी आणि विरोधी आमदारांनी हरकत घेतली. हे वारंवार घडत आल्याने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी त्याची गंभीर दखल घेत, नगरविकास विभागाच्या सचिवांना नोटीस जारी करण्याचे आदेश दिले.

विधानसभेत सत्ताधारी पक्षाकडून नियम २९३ अन्वये मुंबई आणि लगतच्या महानगरपालिकांमधील विविध नागरी समस्यांवर महत्त्वाचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. या प्रस्तावावर दोन्ही बाजूंचे आमदार मुंबईच्या पाणीप्रश्नापासून ते पावसाळ्यापूर्वीच्या कामांपर्यंत अनेक महत्त्वपूर्ण विषय मांडत होते. मात्र, आमदारांच्या या भावना ऐकण्यासाठी आणि त्यांची नोंद घेण्यासाठी अधिकारी गॅलरीमध्ये नगरविकास विभागाचे सचिव किंवा मुंबई महापालिकेचे आयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांच्यापैकी एकही वरिष्ठ अधिकारी उपस्थित नव्हता.

भाजपचे आमदार अतुल भातखळकर यांनी हा मुद्दा उपस्थित करत अधिकारी गॅलरी रिकामी असल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. त्यानंतर संपूर्ण सभागृहाने यावर नाराजी व्यक्त केली. भाजपचे ज्येष्ठ नेते आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी प्रशासनाच्या या भूमिकेवर आक्षेप घेतला.

'चालू अधिवेशनात अधिकारी गैरहजर राहण्याचा हा मुद्दा नवव्यांदा उपस्थित होत आहे. हे सभागृह सर्वोच्च आहे. आपण कायदे करतो, राज्याचा अर्थसंकल्प मंजूर करतो आणि ज्या अधिकाऱ्यांचे पगार आपण मंजूर करतो, तेच अधिकारी इथे उपस्थित राहत नाहीत,' अशा शब्दांत त्यांनी संताप व्यक्त केला.

# महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या माहिती पुस्तिकेचे मुख्य राज्यसेवा हक्क आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव यांच्या हस्ते विमोचन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**अमरावती** – महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ ची नागरिकांमध्ये व्यापक प्रसिद्धी व्हावी आणि त्यांना शासकीय सेवांची परिपूर्ण माहिती मिळावी, या उद्देशाने अमरावती राज्यसेवा हक्क आयुक्त कार्यालयाने तयार केलेल्या विशेष माहिती पुस्तिकेचे आज मुंबई येथील महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाच्या कार्यालयात विमोचन करण्यात आले.

मुख्य राज्यसेवा हक्क आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव यांच्या हस्ते या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

या सोहळ्याला राज्यसेवा हक्क आयुक्त बलदेव सिंग, चित्रा कुलकर्णी, संदीप देशमुख, शिंदे तसेच आयोगाच्या सचिव वैशाली चव्हाण व इतर वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अरुण डोंगरे यांनी प्रास्ताविक करून पुस्तिकेच्या निर्मितीमागील उद्देश स्पष्ट केला. तर कार्यक्रमाच्या शेवटी अमरावती राज्य सेवा हक्क कार्यालयाचे उपसचिव देवेंद्र चव्हाण यांनी मुख्य आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव, सर्व आयुक्त, विशेष कार्य अधिकारी शिंदे आणि सचिव चव्हाण यांच्यासह उपस्थित सर्वांचे आभार मानले.

नागरिकांना शासकीय सेवा वेळेत व पारदर्शकपणे मिळवून देण्यासाठी ही माहिती पुस्तिका अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वास याप्रसंगी व्यक्त करण्यात आला.



**वरुड :** येथील ठाणेदार अर्जुन ठोसरे यांची पदोन्नती होवुन बदली झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना माजी तहसिलदार कमलाकर देशमुख व युवा उद्योजक नितीन गुर्जर.

## डवरगांव जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे

# गणवेश, पाठ्यपुस्तके वाटप आणि विद्यार्थ्यांचे स्वागत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – येथुन जवळच असलेल्या डवरगांव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेशोत्सव व शाळा पुर्व तयारी मेळावा आयोजीत करण्यात आला होता.

या प्रसंगी शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना गणवेश वाटप, पाठ्यपुस्तके वाटप आणि विद्यार्थ्यांचे स्वागत असा नाविण्यपुर्ण कार्यक्रम घेण्यात आला.

याप्रसंगी सरपंच लतिका बोडनासे, इंदिरा कठाणे, स्वप्नील जाणे, चंद्रकांत कठाणे, वंदना सोनुले, ज्योत्स्ना पाटील, सुवर्णा कठाणे, पुजा कठाणे, रेश्मा गणवीर, राजेश पाटील, स्वप्नील नाडगे, राजकुमार पाटील, स्वप्नील जाणे, अंकुश बोडनासे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद मुऱ्हेकर, शिक्षिका वर्षा चव्हाण, उषा गावंडे, किरण कठाणे, स्वाती बहुरुपी आदी उपस्थित होते.

याप्रसंगी शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत होता. यावेळी उपस्थित मान्यवरांचे हस्ते विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत करण्यात आले तसेच शासनाकडून प्राप्त झालेले पाठ्यपुस्तके व गणवेश सर्वच विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसह पालक आणि गावकरी सुध्दा मोठया संख्येने उपस्थित होते.

## पी.एम.नगरपरिषद उच्च प्राथमिक शाळा क्र.४ येथे

# शाळा प्रवेशोत्सवाचा सोहळा साजरा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – पी.एम.नगरपरिषद उच्च प्राथमिक शाळा क्र.४ येथे शाळा प्रवेशोत्सवाचा सो-हळा साजरा करण्यात आला. नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र.४ येथे ३० जुनला शाळेच्या पहिल्या दिवशी नवागतांचे स्वागत करुन सोहळ्याची सुरुवात करण्यात आली.

या सोहळ्याकरीत करीता नगराध्यक्षा सुवर्ण वरखेडे, उपाध्यक्षा सुनिता वंजारी, शिक्षण समिती सभापती निलिमा कुबडे, महिला व बालकल्याण समिती सभापती माधुरी माहोरे, हर्षल फुटाणे, संगीता अकर्ते, शितल होले, सुनीता उईके, पवन मोघे तसेच नगरीचे स्वीकृत सदस्य निलेश फुटाणे यांनी उपस्थिती दर्शविली. इयत्ता पहिलीत प्रवेशित विद्यार्थ्यांचे पाठ्यपुस्तक व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान. हर्षल फुटाणे यांनी भूषविले. शाळेतील इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाचे वितरण करण्यात आले तसेच शाळा पूर्वतयारी मेळावा २ आयोजित करण्यात आलेला होता. याच दिनाचे औचित्य साधून शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या विशेष गरजा लक्षात घेता त्यांच्यासाठी साहित्य वाटप करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन भावना मेंढे, प्रास्तविक प्रशासन अधिकारी माधव तिडके आणि आभार नेहा जाधव यांनी मानले.

कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन मुख्याध्यापिका कांता हरले आणि इतर शिक्षक सविता कांडलकर, नंदकिशोर नागपुरे, पंकज चाफले, ज्योत्स्ना चव्हाण, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सुद्धा कार्यक्रमात मोलाची मदत केली. मुलांचे तोंड गोड करण्यासाठी शालेय पोषण आहारात खिचडी सोबत शिरा देऊन नवीन शैक्षणिक वर्षाची आनंदी सुरुवात करण्यात आली.

## राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी घेतली

# जेष्ठ नेते रमेशदादा देशमुख यांची सदिच्छा भेट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – भाजपाच्या विशेष महा-अभियानांतर्गत आज टेंभुरखेडा येथील भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते रमेशदादा देशमुख यांच्या निवासस्थानी राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी सदिच्छा भेट घेतली. याप्रसंगी डॉ.अनिल बोंडे यांनी रमेशदादा देशमुख यांचा शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार केला आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या यशस्वी व ऐतिहासिक कार्यकाळातील लोककल्याणकारी धोरणांविषयी सविस्तर माहिती दिली.

केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने गेल्या १२ वर्षांत विश्वास, विकास आणि जनकल्याणाचा नवा आदर्श निर्माण केला आहे. या पार्श्वभूमीवर राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी वरुड तालुक्यात नागरिकांशी भेटगाठ करुन केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती दिली. यावेळी डॉ. बोंडे यांनी प्रधानमंत्री आवास योजना, आयुष्मान भारत, जल जीवन मिशन, पीएम किसान सन्मान निधी, उज्ज्वला योजना, डिजिटल इंडिया, पायाभूत सुविधांचा विकास, महिला सक्षमीकरण तसेच गरीब व सर्वसामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी राबविण्यात आलेल्या विविध योजनांबाबत सविस्तर माहिती दिली. केंद्र सरकारच्या विकासकामांमुळे देश आत्मनिर्भरतेच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत असल्याचे त्यांनी सांगितले. या सदिच्छा भेटी दरम्यान भारतीय जनता पार्टीचे निळकंठ मुरुमकर, डॉ.शशिभूषण उमेकर, अमित कुबडे, कृषि उत्पन्न बाजार समिती संचालक प्रविण मानकर, ॲड.शशिकांत उमेकर, सागर देशमुख, हर्षवर्धन आजने यांच्यासह पक्षाचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

## संपादकीय

**जिथे आत्मविश्वास असतो, तिथे अशक्य असे काहीच नसते.**

# श्रीलंकेचे नवे संकट आणि ढासळलेली आरोग्य यंत्रणा

शेजारील राष्ट्र श्रीलंकेवर ओढवलेले आर्थिक संकट अजून पूर्णपणे निवळलेले नसतानाच, आता तिथली आरोग्य यंत्रणा अक्षरशः कोलमडून पडली आहे. एका बाजूला औषधांचा तुटवडा आणि दुसऱ्या बाजूला डेंग्यूच्या साथीने थैमान घातल्यामुळे श्रीलंकेत हाहाकार माजला आहे. परिस्थिती इतकी हाताबाहेर गेली आहे की, रुग्णालयांमध्ये रुग्णांना खाटा (बेड्स) मिळेनाशा झाल्या आहेत आणि अखेर डासांचा नायनाट करण्यासाठी सरकारला थेट ड्रोन आणि लष्कराची मदत घ्यावी लागत आहे. एका सार्वभौम देशाला डासांशी लढण्यासाठी लष्कर उतरावे लागणे, ही त्या देशाच्या आरोग्य आणि प्रशासकीय व्यवस्थेचे अपयश अधोरेखित करणारी अत्यंत गंभीर बाब आहे. आर्थिक संकटातून आरोग्य आणीबाणीकडे श्रीलंकेची अर्थव्यवस्था गेल्या काही वर्षांत अत्यंत नाजूक स्थितीतून गेली आहे. परकीय चलनाची टंचाई आणि चुकीच्या धोरणांमुळे देशाला मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागला. या आर्थिक दिवाळखोरीचा थेट फटका तिथल्या आरोग्य क्षेत्राला बसला. जीवनावश्यक औषधे, वैद्यकीय उपकरणे आणि रुग्णालयांसाठी लागणारे इंधन आयात करणे सरकारला कठीण झाले. परिणामी, आरोग्य व्यवस्था आधीच कमकुवत झाली होती. त्यातच मान्सूनच्या आगमनानंतर उद्भवलेल्या डेंग्यूच्या साथीने या कमकुवत व्यवस्थेवर शेवटचा प्रहार केला. सध्या श्रीलंकेतील प्रमुख शहरांमधील रुग्णालये रुग्णांनी ओसंडून वाहत आहेत. एकाच बेडवर दोन-दोन रुग्णांना उपचार घ्यावे लागत आहेत, तर काहींना जमिनीवर झोपून दिवस काढावे लागत आहेत. वैद्यकीय कर्मचाऱ्यांची कमतरता आणि औषधांचा तुटवडा यामुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. डासांविरुद्ध 'लष्करी' मोहीम आणि ड्रोनचा वापर डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी श्रीलंकेच्या सरकारने जे पाऊल उचलले आहे, ते अभूतपूर्व पण तितकेच चिंताजनक आहे. सामान्यतः महापालिका किंवा आरोग्य विभागामार्फत केली जाणारी धूरफवारणी आणि स्वच्छता मोहीम आता थेट लष्कराच्या हाती सोपवण्यात आली आहे. डेंग्यूच्या डासांची उत्पत्तीस्थाने शोधण्यासाठी आणि त्यांच्यावर कीटकनाशकांची फवारणी करण्यासाठी अत्याधुनिक ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. लष्कराचे जवान घरोघरी जाऊन तपासणी करत आहेत आणि जिथे पाणी साचले आहे, तिथे कडक कारवाई केली जात आहे. तंत्रज्ञानाचा आणि लष्कराचा हा वापर तात्पुरता आराम देऊ शकत असला, तरी तो मूळ समस्येवरचा कायमस्वरूपी तोडगा नाही. डासांशी लढण्यासाठी लष्कराला मैदानात उतरावे लागणे हेच दर्शवते की, तिथली नागरी प्रशासन यंत्रणा पूर्णपणे निकामी झाली आहे. पायाभूत सुविधांचे अपयश कोणत्याही देशात साथीचे आजार पसरण्यामागे तिथली सांडपाण्याची व्यवस्था, कचरा व्यवस्थापन आणि नागरिकांमधील जागरूकतेचा अभाव कारणीभूत असतो. श्रीलंकेत आर्थिक संकटामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांचा निधी थांबला. डेंग्यूचा प्रसार करणाऱ्या 'एडिस इजिप्ती' डासांना अंडी घालण्यासाठी स्वच्छ आणि साचलेले पाणी लागते. श्रीलंकेतील ढासळलेल्या पायाभूत सुविधांमुळे जागोजागी पाणी साचले आणि या डासांचे साम्राज्य वाढले.

# विजयाबाई नावाचे विद्यापीठ

नाटक हा सुट्टा सुट्टा अनुभव नसतो. लाल्याच्या किंवा संभाजीराजांच्या भूमिकेत काशीनाथ घाणेकर यांनी नाटक मारून नेले हे विजयाबाईच्या व्याख्येत बसणारे नाटक नव्हते. नाटकांतील प्रत्येक नट, प्रत्येक प्रसंग यांनी मिळून एक संपूर्ण अनुभव प्रेक्षकाला द्यायला हवा हा त्यांचा आग्रह होता.



१९७० आणि ८० च्या दशकात एक बाई होत्या. त्यांचे खरे नाव इंदिरा गांधी होते. पण राजकीय वतुर्ळात आणि पत्रकारितेतले लोक त्यांचा उल्लेख बोलताना बाई असा करीत. तो करताना त्यामागे कौतुक, आश्चर्य, आदर, भीती असे सर्व भाव असत. राजकारणासारख्या पुरुषी क्षेत्रामध्ये स्वतःचे वर्चस्व निर्माण करण्याच्या कर्तृत्वाला दिलेली ती एक प्रकारची दाद होती.

त्याच काळात मराठी रंगभूमीवरही अशाच एक बाई हुकुमत गाजवत होत्या. त्यांच्याबद्दलच्या बाई या उल्लेखातूनही असेच कौतुक, आश्चर्य, आदर, भीती व्यक्त होत असे. या बाईचे नाव अर्थातच विजया मेहता. दिग्दर्शनासारख्या तोवर पुरुषी मानल्या जाणाऱ्या इलाख्यात बाईंनी वयाच्या विशीतिशीतच मोठा दबदबा निर्माण केला होता.

मराठी समाज स्वतःला पूर्वापार नाटकवेडा समजत आला. बाईंनी सुमारे ५० वर्षांच्या कारकीर्दीत अनेक रंगकर्मींना तर घडवलेच पण पण नाटक म्हणजे काय आणि ते कसे बघायचे असते याची एक नवी दृष्टी प्रेक्षकांना दिली. नवनव्या प्रयोगांची सवय लावली.

मराठी रंगभूमीवरच्या या अद्वितीय बाईंनी मंगळवारी एक्झिट घेतली. नाटकात प्रत्येक पात्राच्या भूमिकेची लांबीरुंदी ठरलेली असते. तद्वतच माणसाच्या आयुष्याला मृत्यूची मर्यादा असते. पण मोठे कलाकार अगदी छोट्या भूमिकेतही मोठा आशय भरू शकतात. बाईसारखे रंगकर्मी तर आयुष्याची मर्यादा ओलांडून अनेक पिढ्यांवर प्रभाव टाकणारे संचित निर्माण करीत असतात.

बाईच्या जाण्याने मराठी रंगभूमीवरच्या एका समृध्द विद्यापरंपरेची कुलगुरु आणि जणू विद्यापीठाची निर्माती काळाच्या पडद्याआड गेली आहे. एकच चांगली बाब ही आहे की, हे विद्यापीठ त्यांच्या असंख्य कलाकृतींमधून, प्रयोगांमधून आणि मुख्य म्हणजे त्यांनी घडवलेल्या कितीएक कलाकारांमधून अखंड पुढे वाहते आहे व पुढेही राहणार आहे.

विक्रम गोखले, नाना पाटेकर, अशोक सराफ, सुहास जोशी, प्रतिमा कुलकर्णी, रीमा लागू, नीना कुलकर्णी यासारख्या असंख्य कलाकारांनी कृतज्ञतेने सांगावे, श्रीराम लागू, अनुपम खेर, नसिरुद्दिन शाह, शबाना आझमी, अमोल पालेकर अशांसारख्यांनी त्यांच्याविषयी अतीव आदराने बोलावे यामधूनच बाई नावाच्या विद्यापीठाची थोरवी कळते.

आपले वडील आणि नंतर बाई यांच्यामुळे आपले पाय जमिनीवर राहिले असे महेश एलकुंचवार यांनी म्हटले आहे. हे सर्व कलाकार आणि त्यांच्याही पुढच्या दोन पिढ्या बाईचे ऋण मानतात यातच सर्व काही आले.

विजयाबाईचा कलेतला प्रवास एखाद्या कादंबरीला शोभेल असा होता व खरे तर त्याच्यावरच एखादे उत्कृष्ट नाटक आणि सिनेमा निघू शकेल. त्यांचे वडील थिऑसॉफिकल सोसायटीचे सदस्य. काका वारकरी. इतके की त्यांच्या नावाने आजही भिवंडीमध्ये मठ उभा आहे व तिथे भजनकीर्तने होतात. लहानपण गिरगाव नावाच्या मराठी मध्यमवर्गाच्या पंढरीमध्ये गेले. त्यांचा जन्म १९३४ चा. त्यामुळे १९४२ ची चळवळ व पुढे मिळालेले स्वातंत्र्य यांचा संस्कार त्यांच्या शाळाकॉलेजच्या वयात त्यांच्यावर झाला. त्याच काळात त्या राष्ट्रसेवा दलात जात होत्या.

स्वातंत्र्यानंतरच्या आपल्या पहिल्या पिढीमध्ये भारताचे नाव जगाच्या नकाशावर नेण्याची कशी उर्मी होती याचे वर्णन त्यांनी अनेक मुलाखतींमध्ये केले आहे. तीच उर्मी त्यांच्या कामामधून प्रकट होत राहिली. कॉलेजमध्ये केलेल्या अत्र्यांच्या नाटकांमधून त्या रंगभूमीवर आल्या. नंतर गिरगावातल्या साहित्य संघाच्या नाटकांमधून कामे करू लागल्या. झुंझारराव, संशयकल्लोळ अशा नाटकातून त्यांनी भूमिका केल्या. जुन्या रंगभूमीशी असलेला हा विलक्षण धागा पुढच्या त्यांच्या सर्व प्रवासात आपल्याला कायम दिसतो.

याच काळात आरंभी त्या खोटे कुटुंबात लग्न करून गेल्या. तिथे त्यांचे आयुष्य बदलले. दुर्दैवाने त्यांच्या पतीचा मृत्यू झाल्याने काही काळ त्या सैरभैर झाल्या पण नाटक या गोष्टीनेच त्यांना सावरले. पुढे फारोख मेहता यांच्याशी दुसरे लग्न करून काही काळ इंग्लंडमध्ये गेला. पुढे मध्यमवर्गीय चौकटीतून त्यांनी वाळकेश्वरच्या उच्चभ्रू वातावरणात प्रवेश केला. पण तरीही नाटकाचे मूळ प्रेम सुटले नाही.

या काळात राष्ट्रीय पातळीवर अल्काझीसारखे नाट्यगुरु आणि नंतर जर्मनीतील ब्रेख्त थिएटर या आंतरराष्ट्रीय चळवळीशी त्या जोडल्या गेल्या. पण मराठी मध्यमवर्गीय मूल्यांबद्दलची आस आणि त्यातली गुंतवणूक कायम राहिली.. बराच काळ उच्चभ्रू व आंतरराष्ट्रीय स्तरावर राहूनही बाई बोलताना अतिशय उत्तम प्रवाही मराठीतच बोलत. त्यांच्या बोलण्यात खूप क्वचित इंग्रजी शब्द येत. मराठी माती, संस्कृती, भाषा यांच्याशी नुसत्या जोडलेल्या नव्हे तर किती घट्टपणे रुजलेल्या होत्या त्याचे ते निदर्शक होते.

वयाच्या अवघ्या एकविसाव्या वर्षी बाईंनी विजय तेंडुलकरांचे श्रीमंत नावाचे नाटक पहिल्यांदा दिग्दर्शित केले. ही कालची पोर आम्हाला काय शिकवणार असे त्यावेळी कोणाला वाटले नाही. किंबहुना, त्या नाटकाच्या तालमींमध्येच तेंडुलकर त्यांना बाई म्हणून हाक मारू लागले व कालांतराने मराठी नाट्यसृष्टीच्याच त्या बाई झाल्या. यातूनच पुढे रंगायन ही नाट्यचळवळ उभी राहिली. श्री. पु. भागवत, श्रीराम लागू, तेंडुलकर, अरविंद देशपांडे अशासारखे विविध क्षेत्रांमधील प्रतिभावान तरुण या चळवळीचे स्थापनकर्ते होते. पण बहुदा सुलभा देशपांडे यांनी एके ठिकाणी वर्णन केले आहे त्याप्रमाणे रंगायन नावाच्या या मधमाशांच्या पोळ्यात विजयाबाईचा दिमाख हा राणीमाशीसारखा होता. तिथे त्या सर्वांच्या केंद्रस्थानी होत्या. सर्व काही त्यांच्याभोवती फिरत होते.

नाटक म्हणजे काय याबाबत बराच काळ मराठी कलावतुर्ळात एक ठराविक मर्यादित समज होती. आधी बराच काळ संगीत रंगभूमीचा दबदबा होता. नंतर मो. ग. रांगणेकरांची कौटुंबिक थाटाची नाटके आली. पण रंगायनने त्या पलिकडे जाणारी, वास्तवाला अधिक थेट भिडणारी नाटके आणली. मराठी नाट्यरसिकांचा अवकाश विस्तारला. ठराविक खलनायक, नायक पठडीतून नाटक बाहेर आले. माणसे व परिस्थितीचे विद्रूप चेहरे दिसू लागले.

मराठी रसिकांची नवी जाणीव घडवण्यासाठी त्याला अत्यंत विचित्र, वेगवेगळे आविष्कार पाहण्यासाठी त्यांची तयारी करून घेण्यासाठी रंगायनवाल्या पिढीने प्रचंड कष्ट केले. या कष्टांमुळेच मराठी नाटकाचे रोप जोमदारपणे उभे राहिले व विस्तारत गेले. नंतरच्या काळातली प्रायोगिक रंगभूमी ते दलित किंवा बंडखोर रंगभूमी हे सगळे मराठी नाट्यसृष्टीने सहज आपल्यात सामावून घेतले याचा पाया रंगायन व त्यासारख्या त्या काळातच्या चळवळींनी घातला. विजया मेहता या त्या चळवळीच्या मुख्य सूत्रधारांपैकी एक होत्या.

नाटक हा सुट्टा सुट्टा अनुभव नसतो. लाल्याच्या किंवा संभाजीराजांच्या भूमिकेत काशीनाथ घाणेकर यांनी नाटक मारून नेले हे विजयाबाईच्या व्याख्येत बसणारे नाटक नव्हते. नाटकांतील प्रत्येक नट, प्रत्येक प्रसंग यांनी मिळून एक संपूर्ण अनुभव प्रेक्षकाला द्यायला हवा हा त्यांचा आग्रह होता.

बाईच्या नाटकात लेखक महत्वाचा असला तरी दिग्दर्शक त्याच्याही वर होता. दिग्दर्शक हा अनुभवाला त्रिमिती प्रदान करतो अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे विजय तेंडुलकर, रत्नाकर मतकरी अशा बलदंड लेखकांसोबत त्यांचे कमी काम झाले. वसंत कानेटकर, जयवंत दळवी यांच्यासोबत त्यांनी बरीच नाटके केली. दळवींच्या बॅरिस्टर, संध्याछाया, सावित्री आणि पुरुषने तर इतिहास घडवला. दळवी नाटके लिहीत नाहीत तर बाई त्यांच्याकडून लिहून घेतात असेही गमतीने त्यावेळी म्हटले जात असे.

पण बाईंनी सतत नवनवीन लेखकांसोबत मैलाचा दगड ठरेल असे काम केले. अनिल बर्वेंचे हमिदाबाईची कोठी हे त्याचे उदाहरण. यातली बुढी तवायफ साकारण्यासाठी बाई स्वतः ग्रँट रोड भागातील तवायफांच्या कोठीवर गेल्या होत्या असे म्हणतात. महेश एलकुंचवार यांच्या वाडा चिरेबंदी हेही त्यांचे चिरेबंदी काम आहे. एकत्र कुटुंबपद्धतीचा खास वैदर्भीय ठाय लयीत होत असलेला ऱ्हास त्यात दर्शवला आहे. चिं.त्र्यं. खानोलकर, भास्कर चंदावरकर यांच्यासारख्या अवलिया कलाकारांच्या सहयोगाने ब्रेख्तच्या शैलीतील अजब न्याय वतुर्ळाचा त्यांनी साकारला. शाकुंतल, मृच्छकटिक, यासारख्या जुन्या संस्कृत नाटकांचा नव्याने शोधही त्यांनी घेतला व तेही प्रयोग चित्तवेधक झाले. बाईंनी सिनेमा थोडा केला. पण तिथेही आपली छाप निर्माण केली. स्मृतिचित्रे हा पहिला सिनेमा निर्माण करण्यापूर्वी एखाद्या शाळकरी विद्यार्थ्याप्रमाणे त्यांनी श्याम बेनेगल यांच्याकडून चित्रपट निर्मितीचे धडे घेतले. नंतर पेस्तनजी हा पारशी समाजावरचा सिनेमा केला. या सर्वांना मोठे पुरस्कार मिळाले. एकूणच, बाईंनी अक्षरशः हात लावील त्याचे सोने केले. याचे कारण बाईची आपल्या कामावर जबर निष्ठा होती. त्याबद्दल त्यांना अतूट असे प्रेम होते. हे आपण केलेच पाहिजे अशी ठाम धारणा होती. आणि हे करण्यासाठी कितीही कष्ट करण्याची तयारी होती. ही निष्ठा, धारणा व कष्टांची तयारी म्हणजेच हेच बाईच्या विद्यापीठाचे बोधवाक्य होते. आता बाई नाहीत. पण आपल्या शेकडो शिष्यांच्या व लाखो रसिकांच्या मनावर त्या हे बोधवाक्य कोरून गेल्या आहेत.

# 'एसआयआर'च्या वर्षपूर्तीनिमित्ताने...

निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पडताळणीची (एसआयआर) प्रक्रिया सुरू होऊन एक वर्ष पूर्ण झाले आहे. ही प्रक्रिया देशाच्या एकात्मतेसाठी आणि अखंडतेसाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचे सिद्ध झाले आहे. बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी २४ जून २०२५ रोजी बिहारमध्ये प्रायोगिक मोहीम सुरू करण्यात आली होती. या प्रक्रियेमुळे आतापर्यंत देशभरात जवळपास सहा कोटी नावे मतदारयादीतून वगळली गेली आहेत. १९ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदारयाद्यांमधील त्रुटी दूर करण्याची ही मोहीम अजूनही सुरूच आहे. बिहारमध्ये प्रारंभी राबवण्यात आलेल्या या मोहिमेनंतर तेथील मतदारयादीतून जवळपास ६५ लाख नावे वगळण्यात आली होती.

बिहारमध्ये पहिल्याच टप्प्यात या प्रक्रियेनुसार ६५ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली होती. त्यावेळी विरोधकांनी विशेषतः युवराज राहुल गांधींनी एकच गोंधळ केला होता. भारतीय जनता पक्षाचे विरोधक असणारे अल्पसंख्यांक म्हणजे मुस्लिम मतदारांची नावे वगळण्यासाठी ही मोहीम उघडण्यात आल्याचा आरोप राहुल गांधींनी नेहमीप्रमाणे आरडाओरड करीत केला होता. विशेष म्हणजे ज्यांची नावे वगळण्यात आली होती त्या मतदारांनी निवडणूक आयोगाकडे तक्रार केली नाही. आपल्याकडे निवडणूक आयोगाने मागितलेली सर्व कागदपत्रे असूनही आपले नाव मतदारयादीत नसल्याबद्दल एकाही मतदाराने सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयात दाद मागितली नाही. मतदारयादीतून घुसखोरांची नावे वगळणे आणि त्यापुढे जाऊन त्यांना आपल्या देशातून बाहेर काढणे हा केंद्र सरकारचा मुख्य उद्देश असल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी वेळोवेळी स्पष्ट केले आहे. या देशाचा खरा नागरिक असलेली एकही व्यक्ती या पुनर्गणनेतून सुटू नये आणि बाहेरून येऊन इथे विष पसरवणारे साप सुयोग्य पद्धतीने वगळले जावेत यासाठी ही सारी यंत्रणा कार्यरत असणार आहे. एकही खरा नागरिक यातून सुटू नये आणि एकाही घुसखोराला वगळल्याशिवाय राहू नये अशा सुस्पष्ट धोरणाने ही प्रक्रिया सुरू झाल्याने घुसखोरांची पाठराखण करणारे अनेक पक्ष, नेते हवालदिल झाले आहेत. या प्रक्रियेविरोधात काही विरोधक न्यायालयात गेले होते. सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच निकाल देत 'एसआयआर'ची प्रक्रिया राबवण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला असल्याचे स्पष्ट केले आहे. मतदारयादी पुनर्निरीक्षणाला घेतले गेलेले सर्व आक्षेपही सर्वोच्च न्यायालयाने फेटाळले आहेत. या




प्रक्रियेची व्यापकता पाहता त्यात कोणाचे अधिकार नाकारले गेले असे म्हणण्यास वाव नाही. एसआयआर प्रक्रियेत नोटीस देणे, नागरिकांची बाजू ऐकणे, हरकतींची नोंद घेणे, त्यावर कार्यवाही करणे आणि अपिलाच्या अधिकाराची तरतूद अशी आवश्यक खबरदारी घेतली गेली होती. मतदारयादीत नाव येण्यासाठी जी कागदपत्रे मागितली गेली होती त्यात कोणतीही मनमानी नव्हती. गेल्या अनेक दशकांमध्ये ही प्रक्रिया राबवली गेली नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात नावे गाळली जाणे साहजिक होते. आधीच्या मतदारयादीत नाव असणे याचा अर्थ एसआयआर पडताळणीनंतरही ते कायम राहील असा नाही. देशातील निवडणूक मुक्त आणि निष्पक्ष वातावरणात होण्यासाठी मतदारयाद्या स्वच्छ होणे अतिशय गरजेचे आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालात स्पष्टपणे नमूद केले होते. विशेष म्हणजे राहुल गांधींनी मतदारयादीतील अशाच त्रुटींबद्दल निवडणूक आयोगाला जबाबदार ठरवले होते. त्यासाठी राहुल गांधींनी अनेक पत्रकार परिषदा घेऊन पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन वगैरे करून मतदारयाद्यांमध्ये खंडीभर चुका असल्याचे दाखवून दिले होते. याच चुका दुरुस्त करण्यासाठी सुरू केलेल्या प्रक्रियेला मात्र त्यांनी जोरदार आक्षेप घेतला.

देशात मतदारयाद्यांची गेल्या २० वर्षांत दुरुस्ती झालेली नसल्याने मतदारयाद्यांमध्ये दुबार नावे, स्थलांतरित मतदारांची अपूर्ण माहिती आणि मृत व्यक्तींची नावे कायम राहतात. झपाट्याने झालेल्या शहरीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाल्याने अनेक मतदारांनी नवीन ठिकाणी नाव नोंदवले. मात्र, जुन्या ठिकाणाहून नाव कमी केले नसल्याच्या घटनाही अनेक आहेत.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# बीडमध्ये विनापरवाना सुरू असलेल्या कलाकेंद्रावर पोलिसांची मोठी कारवाई

## ८ महिलांसह १० जण ताब्यात, एक फरार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**बीड** – तालुक्यातील उदंड वडगाव येथील बेकायदेशीर आणि विनापरवाना सुरू असलेल्या 'जगदंबा कला केंद्रा'वर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. नेकनूर पोलीस आणि अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष (अकढण) बीड यांच्या संयुक्त पथकाने या कलाकेंद्रावर अचानक छापा टाकला. या कारवाईदरम्यान पोलिसांनी ८ महिला आणि २ पुरुषांना ताब्यात घेतले असून, एक आरोपी घटनास्थळावरून फरार होण्यात यशस्वी झाला आहे. परवान्याशिवाय सुरू होते कलाकेंद्र मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी ही धडक कारवाई केली. उदंड वडगाव येथील जगदंबा कला केंद्र चालवण्यासाठी मालकांकडे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर परवाना नसल्याचे पोलीस चौकशीत निष्पन्न झाले. कोणत्याही प्रशासकीय परवानगीशिवाय हे कलाकेंद्र छुप्या पद्धतीने चालवले जात होते. पोलिसांनी केलेल्या प्राथमिक तपासानुसार, आरिफ आसिफ शेख आणि शफिक अली मोमीन नावाचे दोन इसम हे सदर कलाकेंद्र चालवत असल्याचे समोर आले आहे.

## जरुड येथे क्षुल्लक कारणावरुन

# तिघा बापलेकांची एकास मारहाण : गुन्हा दाखल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – येथुन जवळच असलेल्या जरुड येथे क्षुल्लक कारणावरुन तिघा बापलेकांनी एकास मारहाण करुन गंभिर जखमी केल्याची घटना घडली. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी तिघांविरुध्द गुन्हे दाखल केले आहे.

आरोपी व फिर्यादी हे एकाच गावातील रहिवासी असुन नमुद फिर्यादी व आरोपी यांचा जुना वाद असुन जागेमध्ये फिर्यादीने 'तुमचे घर येथे नाही, तर कशाला राहता', असे म्हटले असता नमुद आरोपीतांनी संगनमत करुन काठीने मारुन जखमी केले. अशा फिर्यादी निलेश भालचंद्र बनाईक यांचे जबानी रिपोर्ट वरुन वरुड पोलिसांनी रामायण बलदेव प्रजापती, लकी रामायण प्रजापती, छुटकू रामायण प्रजापती यांचे विरुध्द कलम ११८ (१), ३५१ (२), ११५ (२), ३५२ बीएनएस अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## जुने वादावरुन एकाने दारु प्राशन करुन

# काठीने मारुन एकास केले जखमी : गुन्हा दाखल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – जुने वादावरुन एकाने दारु प्राशन करुन दुसऱ्यास काठीने मारुन गंभिर जखमी केल्याची घटना येथून जवळच असलेल्या राजुरा बाजार येथे घडली. या प्रकरणी वरुड पोलिसांनी फिर्यादीच्या तक्रारीवरुन एकाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

आरोपी व फिर्यादी हे एकाच गावातील रहिवासी असुन नमुद आरोपीने जुने वादावरुन दारु पिवुन येवुन फिर्यादीचे हात व पायावर काठीने मारुन जखमी केले. अशा फिर्यादी प्रेवेष प्रभाकर ढोले (३१) रा.राजुरा बाजार यांचे फिर्यादीवरुन वरुड पोलिसांनी सुरेश अजाबराव सुरजूसे (४५) रा.राजुरा बाजार याचेविरुध्द ११८ (१), ३५१ (२), ३५२ बीएनएस अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# आयव्हीएफ केंद्रांवर सरकारचा वॉच

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्यात सोनोग्राफी आणि आयव्हीएफ केंद्रांद्वारे होणारे गैरप्रकार तसेच गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्याचे उल्लंघन रोखण्यासाठी विशेष पथके नियुक्त करण्यात आली आहेत. या पथकांच्या माध्यमातून संपूर्ण राज्यात सोनोग्राफी आणि गर्भपात केंद्रांच्या तपासणीची धडक मोहीम राबविण्यात येत असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी बुधवारी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

राज्यात विनापरवाना सुरू असलेल्या आयव्हीएफ केंद्रांवरील कारवाईबाबत समाजवादी पक्षाच्या अबू आझमी यांनी प्रश्न विचारला होता.

या प्रश्नाला उत्तर देताना आबिटकर यांनी राज्यात आयव्हीएफ उपचार आणि सिझेरियन प्रसुतीचे प्रमाण अनावश्यकरित्या वाढत असल्याचे निदर्शनास येत असल्याचे सांगितले. त्यामुळे आयव्हीएफ उपचारांचा वापर केवळ वैद्यकीय गरजेनुसारच होण्यासाठी आवश्यक नियमावली तयार करण्यात येणार आहे. अशा प्रकारांमध्ये सहभागी असलेल्या डॉक्टरांसह संबंधित कर्मचारी आणि रुग्णालय व्यवस्थापनावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती आबिटकर यांनी दिली.

## राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेअंतर्गत

# शहरात व परिसरात व्यापक पोलिओ अभियान

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेअंतर्गत देशभरात ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओ लस देण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने प्रा.आ.केंद्र शेंदुरजनाघाट यांच्या वतीने वैद्यकीय अधिकारी डॉ.चेतन कुऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात व परिसरात व्यापक अभियान राबविण्यात आले.

या मोहिमेची सुरुवात प्रा.आ.केंद्र शे.घाट येथून करण्यात आली. यावेळी आरोग्य सहाय्यक संजय वाघाडे, अल्ताफ शेख, आरोग्य सेविका दिपाली तोटे, कल्पना सरणकर, आरोग्य सेवक यश राऊत, निलेश कुर्यवंशी, विवेक दौड उपस्थित होते.

याप्रसंगी वैद्यकीय अधिकारी डॉ.चेतन कुऱ्हाडे यांनी पोलिओमुक्त भारत घडविण्यासाठी तसेच आपल्या मुलाच्या निरोगी भविष्यासाठी ही मोहीम यशस्वी करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, यामुळे लहान मुलांना पोलिओचा डोस आवर्जून द्यावा, असे आवाहन यावेळी केले.

## जिल्हा परिषद कृषी विभागातर्फे

# कृषी दिन साजरा सतिश बहुरुपी सन्मानित

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – महाराष्ट्र शासन कृषी विभाग, जिल्हा परिषद अमरावती तर्फे १ जुलै कृषी दिन पंचायत समिती सभागृहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने राजुरा बाजार येथील प्रगतिशिल शेतकरी सतिश बहुरुपी यांचेसह इतरांचा गौरव करण्यात आला.

कृषी दिनाचे औचित्य साधून तालुक्यात शेती क्षेत्रात सकारात्मक दृष्टिकोन ठेवून कृषी तंत्रज्ञान व प्रयोगशीलता त्यास कष्टाची जोड देत इतर शेतकऱ्यांना प्रेरणादायी, मार्गदर्शन ठरेल अशा उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांचा आज पंचायत समिती सभागृहात राजू कराळे नागझरी, रवी गुलाबराव मेंढे लोणी, रुपाली पुंड उदापूर, गजानन निंभोरकर अमडापूर यांचेसह राजुरा बाजार येथील सतीश बहुरुपी यांचा तालुक्यातील शेतकऱ्यांचा शाल, सन्मान पत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी गटविकास अधिकारी खुशाल पिल्लारे, तालुका कृषी अधिकारी रेहान मुजावर, पंचायत समिती कृषी अधिकारी राजकुमार सावळे सह परिसरातील शेतकरी, कृषी अधिकारी, कृषी सखी, महिला शेतकरी उपस्थित होते.

# क्रिकेट प्रशिक्षकाकडून महिला क्रिकेटपटूचा विनयभंग

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – क्रिकेट शिकवण्याच्या बहाण्याने १९ वर्षीय महिला क्रिकेटपटूचा वारंवार विनयभंग केल्याची धक्कादायक घटना मिरारोड येथे उघडकीस आली आहे. या प्रकरणी पीडित तरुणीच्या तक्रारीवरून मिरारोड पोलिसांनी संबंधित क्रिकेट प्रशिक्षका विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विघ्नेश मेंडन असे गुन्हा दाखल झालेल्या क्रिकेट प्रशिक्षकाचे नाव आहे. पीडित तरुणी ही क्रिकेटपटू असून, ती आणि प्रशिक्षक विघ्नेश मेंडन हे मैदानावर सरावासाठी अनेकदा एकाच रिक्षेतून प्रवास करत असत. तक्रारीनुसार, या प्रवासादरम्यान तसेच मैदान परिसरात आरोपीने पीडितेच्या संमतीशिवाय विनयभंग केला. पीडितेने या कृत्याला विरोध केल्यानंतर आरोपीने मैदानावर इतरांसमोर पीडितेला अश्लील शिवीगाळ करून मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली.

या प्रकाराबाबत पीडित तरुणीने आरोपीच्या पत्नीला तसेच दुसऱ्या प्रशिक्षकाला माहिती दिली. त्याचा राग मनात धरून आरोपीने, 'माझ्या विरोधात पोलिसांत तक्रार केली तर मी आत्महत्या करीन आणि त्याला तूच जबाबदार असशील,' अशी धमकी दिल्याचाही आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

# व्यावसायिक एलपीजी १८३ रुपयांनी कमी, पुरवठाही सुरळीत

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – देशभरातील तेल कंपन्यांनी १ जुलै २०२६ पासून सर्वसामान्यांना आणि व्यावसायिक क्षेत्राला मोठा दिलासा दिला आहे. बुधवारपासून व्यावसायिक वापराच्या एलपीजी सिलेंडरच्या दरात सुमारे १८३ रुपयांची, तर ५ किलोच्या फ्री ट्रेड एलपीजी सिलेंडरच्या दरात सुमारे १३ रुपयांची कपात करण्यात आली आहे. यासोबतच, देशांतर्गत विमान सेवांसाठी लागणाऱ्या 'एव्हिएशन टर्बाइन फ्युएल'च्या दरात प्रति लिटर ५ रुपयांची कपात करून ते ११० रुपये प्रति लिटर करण्यात आले आहेत. मात्र, घरगुती वापराच्या एलपीजी सिलेंडरच्या किमतींमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांशिवाय, देशात ७ हजारांहून अधिक पेट्रोल पंप चालवणाऱ्या खाजगी तेल कंपनी 'नयारा एनर्जी'ने देखील पेट्रोल आणि डिझेलच्या दरात कपात केली आहे. १८३ रुपयांनी कमी, पुरवठाही सुरळीत कंपनीने पेट्रोलच्या दरात प्रति लिटर ५ रुपये आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर ३ रुपयांनी कपात केली आहे. २६ मार्च रोजी संकटकाळात वाढवलेले दर आता पूर्ववत करण्यात आले आहेत.

कंपनीने पेट्रोलच्या दरात प्रति लिटर ५ रुपये आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर ३ रुपयांनी कपात केली आहे. २६ मार्च रोजी संकटकाळात वाढवलेले दर आता पूर्ववत करण्यात आले आहेत. ७ मार्चपासून व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या किमतीत चार टप्प्यांत वाढ झाली होती आणि हा दर १,३४५ रुपयांपर्यंत पोहोचला होता.

## येड्याची जत्रा (मॉर्निंग ग्रुप) टेंभुरखेडा तर्फे

# राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांचे स्वागत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – येड्याची जत्रा (मॉर्निंग ग्रुप) टेंभुरखेडा तर्फे श्री मरामाय मंदिर येथे राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांचे स्वागत करण्यात आले.

मोदी सरकारची १२ वर्षे विश्वास, विकास व जनकल्याणाची या विषय घेत डॉ.अनिल बोंडे यांनी काल अनेकांशी संवाद साधला. नागरिकांशी संवाद साधताना त्यांनी त्यांच्या समस्या, सूचना व अपेक्षा जाणून घेतल्या. शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचावा, यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. या भेटीदरम्यान भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच परिसरातील अनेक नागरिक उपस्थित होते. नागरिकांनी विविध विषयांवर खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्याशी संवाद साधत आपल्या समस्या मांडल्या, त्यावर योग्य तो पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

याप्रसंगी टेंभुरखेडा येथील सुरेशराव पेठे यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी डॉ.अमोल कोहळे, रुपाली सोंडे, उपसरपंच राजेंद्र सोनुले, ॲड.शशिकांत उमेकर, बालु निकम, परिसरातील ज्येष्ठ नागरिक, युवा मित्र आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.




## जरुड येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात

# माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांची जयंती

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती द्वारा संलग्नित जरुड येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात माजी मुख्यमंत्री व कृषितज्ञ स्व.वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली.

स्व.वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण प्राचार्य डॉ.गोपाल तडस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ.गोपाल तडस यांनी माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांनी १९७२ च्या महाराष्ट्रातील भीषण दुष्काळात शेतकऱ्यांसाठी अनेक प्रभावी योजना राबविल्या.

महात्मा गांधी, महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या प्रभावातून वसंतराव नाईकांचे व्यक्तीमत्व उजळून निघाले, असे सांगितले.

याप्रसंगी डॉ.राम कुलसंगे, डॉ.विनायक भटकर, डॉ.अजय कुकडे, डॉ.विष्णु पडवाल, डॉ.रविकांत महिंदकर, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.शशिकांत काळे, महिला रासेयो कार्यक्रमाधिकारी अर्चना राऊत, दिनेश राऊत, निलेश खुरद, प्रा.प्रदीप आवारे, योगेश कासे, निलेश बंदे, संतोष चव्हाण, अनिल हरले, दुर्गा हरले व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# भाषणे ठोकून मते मिळत नाहीत, जनतेत उतरावे लागते

■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)

## मंत्री योगेश कदमांचा राज ठाकरेंना थेट टोला!



**मुंबई** – केवळ व्यासपीठावरून मोठी भाषणे ठोकून मते मिळत नाहीत, तर त्यासाठी प्रत्यक्ष जनतेमध्ये उतरून काम करावे लागते.

महायुती सरकार म्हणून आम्ही सातत्याने जनतेच्या हिताचे काम करत आहोत आणि म्हणूनच लोकसभा, विधानसभाच नव्हे तर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही जनता आमच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहिली आहे,‘ असा थेट आणि अत्यंत मोजका टोला मंत्री योगेश कदम यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांना लगावला आहे.

राजकारणात कोणाचा फायदा करायचा आणि कोणाचा तोटा, हे ठरवण्याचा अधिकार फक्त जनतेलाच असतो, असे सांगत त्यांनी महायुती सरकारच्या कामाची पावती जनतेच्या दरबारात मिळत असल्याचा विश्वास व्यक्त केला.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी लोकप्रतिनिधींची तुलना 'देहविक्री' करणाऱ्यांशी केल्याबद्दल मंत्री योगेश कदम यांनी अत्यंत तीव्र आक्षेप घेतला. लोकशाहीत जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकप्रतिनिधींबद्दल अशा हीन शब्दांत तुलना करणे अत्यंत अयोग्य आणि निंदनीय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याच मुद्द्यावरून राज ठाकरेंना भूतकाळाची आठवण करून देत कदम यांनी एक खोचक सवाल उपस्थित केला. ते म्हणाले की, ‘जेव्हा उद्धव ठाकरे यांनी मनसेचे ६ नगरसेवक फोडून आपल्या पक्षात घेतले होते, तेव्हा राज ठाकरे यांचे या 'देहविक्री'च्या व्याख्येवर काय मत होते? हे त्यांनी एकदा जनतेसमोर स्पष्ट करावे.‘

या विधानातून त्यांनी राज ठाकरेंच्या भूमिकेतील दुटप्पीपणावर थेट निशाणा साधला दुसरीकडे, ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्या आत्मचिंतनाच्या सल्ल्याला उत्तर देताना मंत्री कदम यांनी थेट उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील त्रुटींवर बोट ठेवले.

# कस्तुरबा गांधी विद्यालयातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम सामावून घेण्याबाबत सरकार सकारात्मक लवकरच मंत्रिमंडळात प्रस्ताव मांडणार

■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – महाराष्ट्र विधान परिषदेत आज प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान पालघर जिल्ह्यातील कस्तुरबा गांधी निवासी आदिवासी बालिका विद्यालयातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्तीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला.

आमदार निरंजन डावखरे यांनी, ‘विद्यालयातील १५ पैकी ज्या १० कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत घेण्यात आले आहे, त्याव्यतिरिक्त उर्वरित ५ रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासन काय पावले उचलत आहे, तसेच या अनुभवी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेणार का?‘ असा थेट प्रश्न सभागृहात विचारला. यावर उत्तर देताना गृहराज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत मोठी आणि दिलासादायक घोषणा केली.

‘समग्र शिक्षा अभियान आणि आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याबाबत महायुती सरकार पूर्णपणे सकारात्मक असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार या संदर्भातील सविस्तर प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरीसाठी आणला जाईल,‘ असे महत्त्वपूर्ण उत्तर मंत्री भोयर यांनी दिले.

**आदिवासी भागातील विद्यालये बंद होणार नाहीत, शैक्षणिक प्रक्रिया सुरू: राज्यमंत्री**

चर्चेदरम्यान आमदार निरंजन डावखरे यांनी इतर विभागांप्रमाणे या कर्मचाऱ्यांना ११ महिन्यांच्या कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती देण्याबाबत आणि इतर रिक्त पदांबाबत शासनाच्या भूमिकेची चौकशी केली होती.

त्यावर अधिक स्पष्टीकरण देताना राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी सांगितले की, समग्र शिक्षा योजनेअंतर्गत केंद्र सरकारच्या मदतीने कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय हा महत्त्वाचा उपक्रम राज्यात गेल्या अनेक वर्षांपासून यशस्वीपणे सुरू आहे. पालघर जिल्ह्यात सध्या एकूण ५ अशी विद्यालये कार्यरत आहेत. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबईच्या परिपत्रकानुसार ३१ मार्च २०२६ रोजी या कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त झाली होती.

परंतु, त्यानंतर लगेचच १ एप्रिल २०२६ रोजी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन २ एप्रिल ते ३० सप्टेंबर २०२६ या ६ महिन्यांच्या कालावधीसाठी या अनुभवी कर्मचाऱ्यांना नव्याने नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत.

# मुंबईकरांच्या मदतीसाठी शिवसेना सज्ज : गटनेते अमेय घोले यांनी दिले महत्वाचे निर्देश

■ (प्रतिनिधी वरूड दर्पण)



**मुंबई** – मुंबईत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचणे, झाडे कोसळणे, वाहतूक कोंडी, वीजपुरवठा खंडित होणे यांसारख्या घटना घडत असल्याच्या पार्श्वभूमीवर शिवसेना गटनेते अमेय घोले यांनी आपल्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना तत्काळ सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत. नागरिकांना कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत त्वरित मदत मिळावी, यासाठी समन्वयाने काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.


शिवसेनेच्या निर्देशानुसार, प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपल्या-आपल्या परिसरात उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीची माहिती मिळताच तातडीने घटनास्थळी पोहोचून नागरिकांना आवश्यक ती मदत करावी. पावसामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींवर प्रशासनाशी समन्वय साधून त्वरित उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला आहे. याशिवाय, ज्या भागात शिवसेनेचे खासदार, आमदार किंवा नगरसेवक आहेत, त्या भागातील मदतकार्य आणि समन्वयाची जबाबदारी संबंधित लोकप्रतिनिधींच्या मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात येणार आहे. तर, ज्या भागात शिवसेनेचा लोकप्रतिनिधी नाही, त्या ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेशी समन्वय साधण्यासाठी विशेष नोडल प्रतिनिधी नियुक्त करण्यात आले आहेत.




**वरुड :** वरुड तहसील समोर टेंभूरखेडा येथील महादेवराव कडून यांचे दोन दिवसांन पासुन आमरण उपोषण सुरू होते. त्यांच्या समस्या समजून घेऊन त्यांचे उपोषण सोडण्यात आले. यावेळी तहसीलदार साहेब, भूमी अभिलेख साहेब व नगरसेवक मंडळींनी उपस्थित राहून त्यांना निंबू पाणी देण्यात आले.

# मराठी बालभारतीच्या ६ वीतील 'लोकनृत्य' धड्यावरुन वाद : गुजरातसह इतर ४ राज्यातील लोकनृत्यांचा समावेश

■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)



**नागपूर** – राज्यात यंदाच्या वर्षापासून एकीकडे सीबीएससी पॅटर्ननुसार शालेय शिक्षणपद्धती अवलंबली जात असून मराठी हा विषय सक्तीचा आहे. मात्र, दुसरीकडे मराठी आणि महाराष्ट्र विषयावरुन नेहमीच शिक्षण विभागातील काही ना काही त्रुटी समोर येतात. आता, बालभारतीच्या इयत्ता सहावीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील 'लोकनृत्य' धड्यावरून नव्या वादाला सुरुवात झाली आहे. कारण, या धड्यात एकूण पाच लोकनृत्यांचा समावेश आहे. त्यापैकी, केवळ एक लोकनृत्यू महाराष्ट्रातील असून इतर चार परराज्यांतील आहेत. त्यामुळे, आता या धड्याला विरोध होत असून शासन दखल घेणार का, हे पाहावे लागेल. महाराष्ट्रातील लावणी, लेझीम, धनगरी गजा, गोंधळ, कोळी नृत्य, पोवाडा यांसारख्या समृद्ध लोकपरंपरेला पुरेसे स्थान न दिल्याने जेष्ठ साहित्यिक श्रीपाद भालचंद्र जोशींसह शिक्षण क्षेत्रातील अभ्यासक आणि सांस्कृतिक जाणकारांनी यावरुन नाराजी व्यक्त केली आहे. विद्यार्थी सहाव्या इयत्तेत शिकत असता राज्यातील विद्यार्थ्यांना प्राथमिक स्तरावर महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीची अधिक व्यापक ओळख करून देणे आवश्यक होते.


## जाहीर नोटीस

### तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

क्र.प्रस्तु-१/कावी-३१६/२५-२६ दि.२५/०६/२६

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **अरुण मारोतराव घारपुरे, रा.पोरगव्हाण, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे अरुण मारोतराव घारपुरे, रा.पोरगव्हाण, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.१०/०२/१९६५** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **२५/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील आय.जे.ठाकरे साहेब, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४७३/२०२६** **ने.ता.२८/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) अनिल नारायण उपासे, वय अं.६३ वर्ष, धंदा- मजुरी, २) तन्मय अनिल उपासे, वय अं.२० वर्ष, धंदा- मजुरी, क्र. १ व २ रा.वाठोडा, ता.वरुड, ३) सौ. निकिता स्वप्नील गोहाड, वय अं.२६ वर्ष, धंदा- घरकाम, रा.खडका, ता.वरुड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत बेबी अनिल उपासे, रा.वाठोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२८/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२०/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.एम.डी.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५६८/२०२६** **ने.ता.१९/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) जगदिश लहानु लोखंडे, वय अं.५९ वर्ष, धंदा- शेती, २) अशोक लहानु लोखंडे, वय अं.६४ वर्ष, धंदा- शेती, दोन्ही रा.इसंब्री, पो.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती, ३) कुसूम भिमराव घोडकी, वय अं.५९ वर्ष, धंदा- गृहीणी, रा.जामगांव, ता.वरुड, ४) विमल सुधाकर देशमुख, वय अं.८४ वर्ष, धंदा- गृहीणी, रा.इसंबरी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत लहानु बारकाजी लोखंडे व मयत अंजनाबाई लहानु लोखंडे, रा.इसंबरी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१९/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०१/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५५५/२०२६** **ने.ता.३०/०७/२०२६**

**अर्जदार :-**१) प्रदिप आत्मारामजी भोगे, वय अं.५४ वर्ष, धंदा-शेती, २) उध्दव आत्मारामजी भोगे, वय अं.५३ वर्ष, धंदा- शेती, दोन्ही रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, ३) सौ.पदमा जयप्रकाश दुर्गे, वय अं.६५ वर्ष, धंदा- गृहीणी, रा.गांधी वार्ड जांब, ता.मोहाडी, जि.अमरावती, ४) सौ.गंगा सुभाषराव कडु, वय अं.६० वर्ष, धंदा- गृहीणी, रा.कळमेश्वर, ता.कळमेश्वर, जि.नागपुर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत आत्माराम पांडुरंग भोगे व मयत मुक्ताबाई आत्मारामजी भोगे, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०१/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**





# 'मध्यरात्री धरती हादरली!' औंढा नागनाथात ३.६ रिश्टरचा भूकंप

**भीषण गडगडाटाने नागरिकांची झोप उडाली**

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**हिंगोली** – औंढा नागनाथ तालुक्यासह परिसरात बुधवारी मध्यरात्री झालेल्या भूकंपाच्या धक्क्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

रात्री १ वाजून २० मिनिटांनी झालेल्या या भूकंपाची राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने ३.६ रिश्टर स्केल इतकी तीव्रता



नोंदवली आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू औंढा नागनाथ तालुक्यातील फुलदाभा आणि जलालदाभा परिसरात जमिनीखाली अवघ्या ५ किलोमीटर खोलीवर असल्याने धक्क्यांची तीव्रता अधिक जाणवली.

**घरांच्या काचा थरथरल्या, भांडी–कपाटे हलली :**

रात्रीच्या शांततेत अचानक झालेल्या गडगडाटानंतर काही सेकंद जमीन हादरली. अनेक घरांच्या खिडक्यांच्या काचा थरथरल्या, तर घरातील भांडी आणि कपाटातील वस्तू हलल्याने नागरिकांमध्ये एकच घबराट उडाली. सुदैवाने या भूकंपात कोणतीही जीवितहानी किंवा मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे वृत्त नाही. मात्र, सततच्या भूकंपाच्या धक्क्यांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे सावट कायम आहे.

**अनेक गावांना जाणवले तीव्र धक्के :**

भूकंपाचा केंद्रबिंदू फुलदाभा–जलालदाभा परिसरात असला तरी त्याचे धक्के औंढा नागनाथ तालुक्यातील फुलदाभा, जलालदाभा, पिंपळदरी, राजदरी, सोनवाडी, निशाणा, असोंदा, काकडदाभा, पांगरा, मेथा, जडगाव, राजापूर आणि जांब या गावांसह वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे, कुपटी, वापटी, कुरुंदा आणि गिरगाव येथेही जाणवले.

# आयपीएस अधिकाऱ्याला लाच प्रकरणी अटक

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**नवी दिल्ली** – कथित ३ कोटी रुपयांच्या लाच प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) दीपक गहलवत नावाच्या वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्याला अटक केली आहे. हे अधिकारी सध्या नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्युरो मध्ये सहसंचालक म्हणून कार्यरत होते. बनावट औषध निर्मिती रॅकेटच्या तपासाशी संबंधित हे प्रकरण असल्याचे समोर आले आहे. सीबीआयने दिलेल्या माहितीनुसार, पुद्दुचेरी



येथील एका व्यावसायिकावर बनावट औषध निर्मिती प्रकरणी सीबीआयचा तपास सुरू होता. या तपासात व्यावसायिकाला मदत करण्यासाठी आणि त्याच्या बाजूने निकाल लावण्यासाठी गहलवत यांनी लाचेची मागणी केली होती. सीबीआयमधील अधिकाऱ्यांवर आपला प्रभाव असल्याचे सांगून त्यांनी हे कृत्य केल्याचा आरोप आहे. या प्रकरणाच्या तपासासाठी सीबीआयने अधिकाऱ्याच्या संबंधित ठिकाणांवर छापे टाकून अनेक डिजिटल उपकरणे, हार्ड डिस्क आणि महत्त्वाची कागदपत्रे जप्त केली आहेत.

# 'पंप-अँड-डम्प' गैरव्यवहार

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**नवी दिल्ली**– २०१७ ते २०२० दरम्यान पाच कंपन्यांच्या शेअर्समध्ये मोठ्या प्रमाणावर 'पंप–अँड–डम्प' (किंमती कृत्रिमरित्या वाढवणे आणि नंतर शेअर्स विकून नफा कमावणे) गैरव्यवहार केल्याबद्दल भांडवल बाजार नियामक 'सेबी'ने कडक पाऊल उचलले आहे. सेबीने मुख्य सुत्रधार व वैयक्तिक गुंतवणूकदार हनिफ शेखसह २२१ संस्था व व्यक्तींवर ७ वर्षांपर्यंत शेअर बाजारात व्यवहार करण्यास बंदी घातली आहे, तसेच हनिफ शेखला १० कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे. भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाने (सेबी) मंगळवारी जारी केलेल्या आदेशात म्हटले आहे की, या प्रकरणाचा मुख्य सूत्रधार हनिफ शेख आणि त्याच्याशी संबंधित इतर संस्थांनी मौरिया उद्योग लि., ७एनआर रिटेल, दार्जिलिंग रोपवे कंपनी, जीबीएल इंडस्ट्रीज आणि विशाल फॅब्रिक्स लि. या पाच कंपन्यांच्या शेअर्समध्ये फेरफार केला होता.

# राज्यातील आरोग्य व्यवस्थेचे 'ऑडिट' होणार?

*** आरोग्यमंत्री सकारात्मक : टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेससारख्या संस्थांची निवड होणार**

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या आणि दर्जेदार आरोग्य सुविधा मिळवून देण्यासाठी शासकीय आरोग्य यंत्रणेचे त्रयस्थ आणि नामांकित संस्थेमार्फत नियमित 'ऑडिट' (गुणवत्ता मूल्यमापन) करण्याबाबत राज्य सरकार सकारात्मक असून, यासाठी 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस'सारख्या (टीस) ख्यातनाम संस्थेची निवड करण्याबाबत विचार केला जाईल, अशी घोषणा आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी गुरुवारी विधानपरिषदेत केली.





आमदार सत्यजीत तांबे यांनी अर्धा तास चर्चेदरम्यान राज्यातील आरोग्य व्यवस्थेतील त्रुटींवर बोट ठेवत शासकीय रुग्णालयांचे ऑडिट करण्याची आणि खासगी रुग्णालयांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याची मागणी केली होती, त्याला उत्तर देताना आरोग्यमंत्र्यांनी ही सकारात्मक ग्वाही दिली. सभागृहात झालेल्या या चर्चेत आमदार सत्यजीत तांबे यांनी राज्यातील शासकीय आरोग्य यंत्रणेच्या सद्यस्थितीवर चिंता व्यक्त केली. शासकीय रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर असणारी मनुष्यबळाची कमतरता, औषधांचा वारंवार होणारा तुटवडा आणि उपचारांसाठी लागणारा विलंब यांमुळे गरीब रुग्णांना नाईलाजाने खासगी रुग्णालयांची पायरी चढावी लागते. आयुष्मान भारत आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेमुळे राज्यातील जनतेला मोठा आधार मिळत असला, तरी अनेक गंभीर आजार आणि मुंबई–पुण्यातील अनेक नामांकित खासगी रुग्णालये अजूनही या योजनांच्या कक्षेबाहेर आहेत. त्यामुळे या प्रमुख रुग्णालयांना योजनेत समाविष्ट करून घेण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलावीत आणि आयुष्मान भारत योजनेत समाविष्ट नसलेल्या आजारांबाबत आपले धोरण स्पष्ट करावे, अशी आग्रही मागणी तांबे यांनी केली. त्याचप्रमाणे सर्व शासकीय रुग्णालयांचे स्वतंत्र आणि त्रयस्थ संस्थेमार्फत नियमित गुणवत्ता मूल्यमापन करावे. मुख्यमंत्री सहायता निधीची प्रक्रिया अधिक सुलभ करून लोकप्रतिनिधींना ऑनलाइन प्रस्ताव सादर करण्याची सुविधा द्यावी.

# तुकाराम मुंढेंचा मोठा दणका! छ. संभाजीनगरमधील नामांकित 'यल्ला यल्ला' आणि 'आईच्या गावात' हॉटेलचे थेट परवाने निलंबित

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**ठाणे** – हॉटेलमध्ये जाऊन चमचमीत आणि चवदार जेवणाचा आस्वाद घेणाऱ्या खवय्यांसाठी एक अत्यंत धक्कादायक आणि डोळे उघडणारी बातमी समोर आली आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या संपूर्ण राज्यात 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' ही विशेष मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेअंतर्गत छत्रपती संभाजीनगर शहरातील अत्यंत लोकप्रिय आणि नामांकित असलेल्या 'यल्ला यल्ला रेस्टॉरंट' आणि 'आईच्या



गावात' या दोन मोठ्या हॉटेल्सवर एफडीएच्या पथकाने धडक छापे टाकले.

या तपासणीत किचेनमध्ये रासायनिक रंगांचा बेसुमार वापर, बुरशी आलेले अन्नपदार्थ आणि ग्राहकांची उघड फसवणूक होत असल्याचे रंगेहाथ पकडण्यात आले. या गंभीर त्रुटींमुळे दोन्ही हॉटेल्सचे अन्न परवाने पुढील आदेशापर्यंत तातडीने निलंबित करण्यात आले आहेत. 'यल्ला यल्ला रेस्टॉरंट'मध्ये केमिकल रंगांची उधळण विद्या नगर येथील प्रसिद्ध 'यल्ला यल्ला रेस्टॉरंट'च्या किचेनची तपासणी केली असता तेथे ग्राहकांच्या आरोग्याशी भयानक खेळ सुरू असल्याचे आढळले.

हॉटेलमध्ये ग्राहकांच्या आवडीचे बटर चिकन, कबाब आणि चिकन लॉलिपॉप आकर्षक दिसावे म्हणून त्यांच्या ग्रेव्हीत मोठ्या प्रमाणावर हानिकारक अशा 'सिंथेटिक फूड कलरचा' बेसुमार वापर केला जात होता. एफडीएच्या पथकाने कारवाई करत जागेवरच तब्बल २० ते २५ रासायनिक रंगांचे डबे जप्त करून ते नष्ट केले आहेत. 'आईच्या गावात' रेस्टॉरंटमध्ये बुरशीयुक्त अन्न आणि फसवणूक दुसरीकडे, ईतखेडा–कांचनवाडी परिसरातील लोकप्रिय ठरलेल्या 'आईच्या गावात' रेस्टॉरंटमध्ये ग्राहकांची सर्रास आर्थिक फसवणूक केली जात होती.

